**रे.के.नं. १८/२००७**
**नि.क्र. ४७/क**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | विक्रम सदाशिव जगताप |
| वय | - | ६४ वर्षे |
| व्यवसाय | - | सेवानिवृत्त |
| राहणार | - | जेजुरी |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे</u>**

१. मी सन २००५ मध्ये न्हावा शेवा पोलीस ठाण्यात पी.एस.आय पदावर बदली होऊन आलो होतो. गुन्हा क्र. ०७/२००४ हा माझेकडे तपासकामी सोपविण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासत केवळ रासायनिक तपासणीचा अहवाल येणे बाकी होते. त्यामुळे मी तहसिलदार उरण यांचे सोबत पत्र व्यवहार करुन अहवाल प्राप्त करुन घेतला. त्यानंतर तो अहवाल न्यायालयात सादर केला. मी सदर कागदपत्रांचे अवलोकन केले होते. त्यानुसार आरोपी क्र. १ व २ यांचे विरुद्ध दोषारोप दाखल करण्या इतपत पुरावा मिळून आला होता. त्यामुळे मी त्यांचे विरुद्ध दोषारोपत्र दाखल केले. दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी रासायनिक तपासणीच्या अहवालामुळे विलंब झाला होता त्यामुळे न्यायालयास पत्र व्यवहार केला होता. त्याबाबतचे पत्राची कार्यालयीन प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. ते पत्र दि. २०/०२/२००७ रोजीचे आहे, करीता सदर पत्राला निशाणी क्र. ४८ देण्यात येत आहे.

**<u>सदर प्रकरण हे आरोपी विरुद्ध फौ.प्र.सं. कलम २९९ प्रमाणे चालविण्यात येत असल्याने आरोपी तर्फे उलट तपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**
**दिनांक – ०३/१२/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण**